**प्रेसनोट** **दि.११/०७/२०१९**

## विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर

## गुन्हा रजि नं.२६४/२०१९ भा.दं.वि.कलम ४०७,३४ गुन्हा उघडकिस आणुन ०३ अटक आरोपी कडुन गुन्हयातील माल जप्त केला

विमानतळ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. नं.२६४/२०१९ भा.दं.वि.कलम ४०७,३४ मधील फिर्यादी नामे निखील शिरीष कुलकर्णी वय ३५ वर्षे रा. अक्षय संस्कृती फलॅट नं. ४०१,बायफ रोड,वाघोली पुणे यांनी दिनांक १९/०६/२०१९ रोजी तक्रार दिलेत मजकुर की, दिनांक १९/०६/२०१९ रोजी सकाळी ०६/०० ते ७/३० वा.चे दरम्यान कास्टींग यार्ड वाघोली ते जे कुमार इंफ्रा प्रोजेक्ट कंपनीची साईट येरवडा पुणे येथे जे एस डब्ल्यु स्टिल लिमीटेड उरण मुंबई कंपनीकडुन एका ट्रेलर नंबर एम एच ४६/ए एफ ६३२७ मधुन १० स्टील रॉड बंडल खरेदी करुन मागविले असतांना कास्टींग यार्ड वाघोली ते जे कुमार इंफ्रा प्रोजेक्ट कंपनीची साईट येरवडा पुणे येथे आलेनंतर यातील ट्रेलर ड्रायव्हर क्लिनर, व स्टोअर किपर यांनी आपसात संगणमत करुन ट्रेलर मधील १० स्टील रॉड बंडल पैकी १ स्टीलरॉड बंडल वजन ३.६७२ टन किं. रुपये २,००,००/- चा माल कंपनीचे व फिर्यादीचे संमतीशिवाय काढुन घेवुन अपहार केलेला असल्याबाबत फिर्यादीने तक्रार दिल्याने विमानतळ पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सहा. पोलीस निरीक्षक खोकले व पोलीस हवा. अशोक आटोळे, पो ना संजय आढारी, पो शि कापुरे, पो शि महाजन विमानतळ पोलीस स्टेशन पुणे यांनी दिनांक १९/०६/२०१९ रोजी त्यांचे बातमीदारां मार्फत बातमी काढुन ट्रेलरचा चालक आरोपी नामे १. आशिष राजेंद्र उपाध्याय वय २३ वर्षे रा. भिवंडी टेमघर पाईपलाईन जवळ मुळगांव प्रतापगड उत्तरप्रदेश राज्य, २. क्लिनर आरोपी नामे दिलीप इकबाल बहादुरसिंग वय ३८ वर्षे मुळगांव कांदरपुर प्रतापगड उत्तरप्रदेश राज्य ३. स्टोअर किपर आरोपी नामे चंद्रकांत अरविंद वाघाज वय १९ वर्षे रा. महालक्ष्मी लॉन्सजवळ खांदवे यांचे जागेत लोहगांव पुणे यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन किं. रु २,००,०००/- माल हस्तगत करुन पोलीस हवा. अशोक आटोळे यांनी त्यांना दिनांक १९/०६/२०१९ रोजी २३/५५ वाजता अटक करुन गुन्हा उघडकिस आणुन उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे. दाखल गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे हे करीत आहेत.